CMYK

नांदेड क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेचे शानदार उद्घाटन >> पान 2

निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखा- जिल्हाधिकारी अभिजीत राऊत >> पान 3


उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा >> पान 4

**सुविचार**

स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवायला शिका तरच इतर तुमच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवतील.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



कोकण हार्टेड गर्लचे सूर जुळले; सांगितलं बॉयफ्रेंडच नाव आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 75 ■ सोमवार, दि. 21 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## भाजपची पहिली यादी जाहीर ९९ उमेदवारांची घोषणा

### बहुतांश जुन्याच उमेदवारांना पुन्हा संधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीचे ररणधुमाळी सुरू झाली असून जागा वाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे.असे असताना भाजपने ९९ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले असून त्याची यादी प्रसिद्ध केली आहे. या पहिल्या यादीमध्ये भाजपचे बहुतांश जुन्या फळीतील उमेदवार असल्याची दिसून येत आहे. भारतीय जनता पक्ष, शिवसेना एकनाथ शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या पक्षाच्या पक्षाने एकत्र येत महायुती केली आहे.गत दोन वर्षापासून महायुतीचे सरकारही चालवले जात असून आता होणारी विधानसभा निवडणूक ही महायुती एकत्रित लढणार असल्याची घोषणा केली आहे.



त्यामुळे जागा वाटपाची वाटाघाटी सुरू आहे. ज्या जागांवर इतर घटक पक्षातील उमेदवारांचा दावा नाही अशा ठिकाणी भाजपने पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर करून त्याची यादी प्रसिद्ध केली आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीमध्ये भारतीय जनता पक्षाचे जुने उमेदवारच पुन्हा दिले असल्याचे दिसून येत आहे. तर उर्वरित जागांबाबत चर्चा सुरू असून निर्णय प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असल्याची माहिती आहे. एका जागेवर एका पेक्षा जास्त उमेदवारांनी दवा केला अशा ठिकाणी निर्माण झालेला पेच हा समोपचाराने सोडून त्या ठिकाणी सर्वांच्या सहमतीने उमेदवार जाहीर केले जाणार असल्याचे माहिती आहे.

### माजी मंत्री संजय कुटे यांना भाजपकडून उमेदवारी जाहीर

वाशीम– भारतीय जनता पक्षाने आज ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये माझे सुद्धा नाव आहे.पक्षाने माझ्यावर विश्वास टाकून मी केलेल्या कामाच्या बळावर मला पाचव्यांदा संधी दिली आहे. अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे आमदार तथा माजी मंत्री संजय कुटे यांनी वाशीम येथे प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल जळगाव जामोदचे आमदार तथा माजी मंत्री डॉ. संजय कुठे म्हणाले की, वीस वर्षात मतदारसंघामध्ये मी समाधानकारक काम केले. शेवटी जनता जनार्दनाने ठरवायचे आहे की चार टर्म मधले संजय कुटे यांचं काम समाधानकारक आहे की नाही. मला विश्वास आहे. जनता माझ्या कामावर समाधानी आहे. माझ्या टक्कर मध्ये मीच असतो. मी कुणासोबतही टक्कर लावत नसतो, कुणावर टीकाही करत नसतो. माझं केलेलं काम आणि भविष्यामध्ये मी काय करणार याची ब्लू प्रिंट मांडतो. आज घोषित केलेल्या ९९ उमेदवारांपैकी बहुतांश माझे विधिमंडळातील जुने सहकारी आहेत. हे सर्व भारतीय जनता पार्टीच्या शिस्तीमध्ये राहणारे कार्यकर्ते आहेत. यापैकी बहुतांश निवडून येतील असा विश्वास संजय कुटे यांनी व्यक्त केलाय.

### महायुतीचे सर्व उमेदवार प्रचंड मताने जिंकणार चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रिय निवडणुक समितीने ९९ उमेदवाराची यादी जाहिर केली. सर्व महायुतीचे उमेदवार प्रचंड मताने जिंकणार असा विश्र्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला ते येथे प्रसारमाध्यमांची बोलत होते. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी पुढे म्हणाले की, राज्याच्या विकासासाठी आम्हाला सरकार हवंय, केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुतीच सरकार राज्याचं विकास करणार सरकार आहे. तर अशोक चव्हान यांच्या मुलीला भोकर मतदार संघात उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. तेथे अशोक चव्हाण उमेदवार राहिले आहे, भाजपला जिंकण्यासाठी मोठा स्पेस असल्याने हा निर्णय घेतला. तर कामठी मतदारसंघाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की जेव्हा जी जबाबदारी दिली ती पार पाडावी लागते, मागील वेळेस संघटन सांभाळायला सांगीतले, आता निवडणुक लढायला सांगितली आहे. आमचा काही वाद नाही, आमचे तीनही पक्षाचे उमेदवार जे जिंकू शकतात असेच आहेत. तर महाविकास आघाडीचे नेते एकमेकाचे कपडे फाडतील आणि एक दिल के तुकडे हुये हजार अशी स्थिती त्यांची होणार आहे. अशी टीका बावनकुळे यांनी महाविकास आघाडीवर केली.

### पुण्यातून धावणार तब्बल ४ वंदे भारत ट्रेन ; प्रवास होणार अधिक गतिमान

**पुणे/प्रतिनिधी :** रेल्वेने गेल्या काही वर्षात ट्रेनच्या सोयींमध्ये कायापालट केला आहे. त्यामुळे अनेकजण जवळच्या आणि लांबच्या प्रवासासाठी रेल्वेला प्राधान्य देत आहेत. दरवर्षी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन ट्रेनची निर्मिती होऊ लागली आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुपरफास्ट झाला असून , वेळेची बचत झाली आहे. त्यातच पुणेकारणांसाठी एक आनंदाची बातमी आहे.

पुण्यातून धावणाऱ्या वंदे भारत ट्रेनच्या संख्येत वाढ होणार असून , हि संख्या फक्त एक किंवा दोन पुरतीच मर्यादित नसून तब्बल चार वंदे भारत ट्रेन धावणार आहेत. पुण्यातील प्रवाशांसाठी वंदे भारत एक्सप्रेसच्या आगमनामुळे प्रवास जलद आणि सोयीस्कर झाला आहे. काही आठवड्यांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे ते कोल्हापूर आणि पुणे ते हुबळी मार्गावर धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवून मान्यता देण्यात आली . त्याचसोबत मुंबई ते सोलापूर दरम्यान धावणारी वंदे भारत ट्रेन पुण्याच्या मार्गावरून जात आहे.

## विदर्भातील जागांवरून महाविकास आघाडीत अजूनही तिढा कायम

### १२ जागांसाठी ठाकरे गट आग्रही!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विदर्भातील जागांवरून महाविकास आघाडीमध्ये अजूनही तिढा कायम आहे. विदर्भामध्ये आठ जागा मिळत असल्याने कमालीचा नाराज झालेल्या ठाकरे गटाने कोणत्याही परिस्थितीत १२ जागा मिळण्यासाठी आग्रह कायम ठेवला आहे. त्यामुळे जागावाटपाचा तिढा आता काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचला आहे. कोणत्याही परिस्थितीत वाटप झालेल्या जागांपेक्षा ठाकरे गटाला विदर्भामध्ये चार जागा अधिकच्या हव्या आहेत. त्यामुळे जागा वाटपाचा तिढा कायम आहे. विदर्भामध्ये ६२ विधानसभेच्या जागा आहेत, त्यापैकी ४६ जागा काँग्रेसकडे आठ जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि आठ जागा शिवसेना ठाकरे गटाला असं वाटप झालं आहे.

मात्र विदर्भामध्ये १२ जागांवर ठाकरे आग्रही आहे. विदर्भातील



रामटेक, कामठी, दक्षिण नागपुर, वरोरा, आरमोरी , भंडारा, बुलढाणा, सिंदखेडराजा, आरणी, वर्धा, यवतमाळ, दिग्रज या जागांसाठी उद्धव ठाकरे गट आग्रही आहे. मात्र, विदर्भात काँग्रेसची ताकद जास्त असल्याने या जागा काँग्रेसला सोडाव्यात इतर ठिकाणी आम्ही कमी घ्यायला तयार असल्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. मात्र, विदर्भामध्ये १२ जागांपेक्षा आम्ही कमी जागा घेणार नसल्याची भूमिका उद्धव ठाकरे गटाकडून घेण्यात आली आहे. त्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यामध्ये वाद झाला होता.

दरम्यान, या वादानंतर काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला तातडीने मुंबईत दाखल झाले. त्यांनी मातोश्रीर जात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेत चर्चा केली. रमेश चेन्नीथला यांनी महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून कोणत्याही वाद नसल्याचे म्हटलं आहे. एक ते दोन दिवसांत जागांवरती चर्चा करून जागावाटप जाहीर केले जाईल, असेही रमेश चेन्नीथला यांनी म्हटलं आहे.

ते म्हणाले की, मी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे, त्यांची प्रकृती ठीक नाही. मला एवढेच सांगायचे आहे की उद्धव ठाकरेही निरोगी आहेत आणि महाविकास आघाडीही निरोगी आहे. आमच्यात कोणत्याही प्रकारचा वाद नाही. जागावाटपाबाबत आज बैठक बोलावण्यात आली आहे.

या बैठकीत नाना पटोले, संजय राऊत, जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली जागावाटपाबाबत बैठक होणार आहे. संजय राऊत म्हणाले की, रमेश चेन्नीथला मातोश्रीवर आले होते आणि उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आम्ही चर्चा केली. दोन दिवसांपासून रखडलेली चर्चा आज दुपारी पुन्हा सुरू होणार आहे. रात्री उशिरापर्यंत चर्चा पूर्ण करून जागावाटप निश्र्चित केले जाईल, असे आम्ही ठरवले आहे. समाजवादी पक्ष आमच्यासोबत असून शुक्रवारी उद्धव ठाकरे आणि अखिलेश यादव यांच्यात चर्चा झाली.

## लॉरेन्स बिश्नोईच्या चुलत भावाचा सर्वात मोठा खुलासा!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची हत्या तसेच अभिनेता सलमान खान याला सतत मिळणाऱ्या धमक्या यामुळे कुख्यात गॅंगस्टर लॉरेन्स बिश्नोई प्रचंड चर्चेत आहे. एप्रिल महिन्यात लॉरेन्सच्या टोळीतील शूटर्सनी सलमानच्या घराबाहेर गोळीबार केला, त्यानंतर सलमानला अनेकदा जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. तर आता आठवडाभरापूर्वीच (१२ ऑक्टोबर) सलमानचा खास मित्र असलेले आणि राजकारणी बाबा सिद्दीकी यांची लॉरेन्सच्या गॅंगमधील शूटर्सनीच निर्घृण हत्या केली.



सध्या लॉरेन्स हा गुजरातच्या साबरमती तुरूंगात कैद आहे. याचदरम्यान लॉरेन्स बिश्नोईचे चुलत भाऊ ५० वर्षीय रमेश बिश्नोई यांनी याबाबत मोठा खुलासा केला आहे. लॉरेन्स नेहमी महागडे कपडे आणि बुट वापरतो, त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च येत असल्याचा दावा त्याच्या एका चुलत भावाने केला आहे.

आम्ही सुरुवातीपासूनच श्रीमंत होतो. लॉरेन्सचे वडील हे हरयाणा पोलीस दलात शिपाई होते. गावाकडे त्यांची ११० एकर जमीन आहे. लॉरेन्स नेहमी महागडे कपडे आणि शूजचा वापर करतो. आता ही त्याचे कुटुंब त्याच्यावर वार्षिक ३५–४० लाख रुपये खर्च येतो, अशी माहिती रमेश बिश्नोई यांनी दिली.

लॉरेन्स बिश्नोई २०१४ मध्ये राजस्थान येथील सालासर बालाजी मंदिर यात्रेदरम्यान गोळीबारानंतर तुरूंगात आहे. सध्या तो अहमदाबाद येथील साबरमती मध्यवर्ती तुरूंगात कैद आहे. गुजरात एटीएस आणि राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा अनेक प्रकरणात त्याची चौकशी करत आहे.

लॉरेन्स कॅनडा पोलिसांच्याही रडारवर

लॉरेन्स बिश्नोई गेल्या काही वर्षांत तीन मोठ्या हत्यांप्रकरणी केवळ भारताच्याच नव्हे तर कॅनडाच्या पोलिसांच्याही रडारवर आहे. पंजाबी गायक सिद्धू मूसावालाची हत्याही त्याच्याच टोळीतील गुंडांनी केली होती.

## जरांगे पाटलांनी रणशिंग फुंकले; विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा प्लॅन

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरागे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा प्लॅन आखला आहे. समिकरण जुळवाजुळव सुरु असल्याचे जरांगे पाटील यांनी सांगुन आपण कुठे निवडून येऊ शकतो. दलीत मुस्लिम एकत्र आहे ते पाहुयात. तुम्ही फॉर्म भरून घ्या. फॉर्म मागे घ्यायच्या रोजी आपण निर्णय घेऊ असे मनोज जरांगे पाटील यांनी मत व्यक्त केल्याने राज्याच्या राजकारणात मात्र एकच खळबळ उडाली आहे. तर मनोज रंगे पाटील यांच्या निर्णयाचा अनेक मतदारसंघात स्टॅंडिंग आमदारांना धक्का बसण्याची शक्यता आहे वर्तवली जात आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला असून कार्यकर्त्या सोबत चर्चा करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अनेक सूचना सुद्धा केल्या आहेत. ते म्हणाले की, पक्ष, नेत्याकडून बोलू नका, समाजाकडून बोला. आंदोलन उघडे पडू देणार नाही. मला माझ्या समाजासाठी आंदोलन करायचे आहे. महाविकास



आघाडी आणि महायुती आरक्षण देतो म्हणत नाहीत. महायुती,मविआने अजून संपूर्ण यादी जाहीर केली नाही. पण जर आपलं ठरले तर दोघांचा कार्यक्रम करायचा आहे.मला एकटे पडू देऊ नका. जिथे आपले उमेदवार निवडून येतील तिथे उभे करावे. एससी, एसटी च्या जागी उमेदवार देऊ नये. तिथे आपल्या विचारांच्या माणसाला मते देऊ. ज्याला आपली मागणी मान्य आहे, जो आपल्या विचारांचा आहे. त्याला मत द्या, असा सल्ला दिला व उभे करायचे की पडायचे? असा प्रश्न यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित मराठ्यांना केला. यावेळी सर्वांनी लढण्याचा निर्धार केला. माजी निवडणुकीकडे जायची इच्छा नाही, पण मी समाजाच्या पुढे नाही. समाजाचे जे म्हणणं ते माझं आहे, असे म्हणत जरांगे यांनीही खो दिला. आपण राजकारणात जाऊ नये, अशी माझे म्हणणे आहे. पण तुम्ही सर्वांनी पाडायचे की उभे राहायचे ठरवा. माझी इच्छा राजकारणात जायची इच्छा नाही. विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करायचे ठरले तर समाजाचे प्रश्न मागे पडायला नको असे म्हणत महाविकास आघाडी आणि महायुतीवाले सगळे सख्खे मावस भाऊ आहेत. आपण उभे राहिले की भाजप वाले खुश होतील. आणि उभे नाही केले तर माहाविकास आघाडी वाले खुश होतील, असे जरांगे म्हणाले. आपल्या हाताने आपण संपू नये म्हणून वेगळा मार्ग काढला पाहिजे. आपण गाफील राहिलो तर अवघड आहे, असेही जरांगे म्हणाले. तसेच आपल्या लोकांचे म्हणणे हे तात्काळ निर्णय घ्या असे आहे. मग आपण १३ महिने काय केले? फॉर्म भरायला वेळ आहे. चिन्ह मिळायला वेळ आहे. मग प्रचार कसा करायचं? गडबड कशाला करायची. आपल्याला जे चिन्ह मिळाले ते दोनच तासात राज्यात जाईल. चिन्हाचा लोड नाही. प्रचाराची गरज नाही. जरी लोकांनी उमेदवाराचे तोंड नाही पाहिले तर मतदान करा. तुमचे त्यांनी काम केले नाही तर मी आहे त्यांच्या कडून काम करून घ्यायला. आपला समाजाने लय संघर्ष केला आहे. समजासोमोर संकट उभे केले आहे.८० टक्के पेक्षा जास्त मतदान एक शिक्का चालणार आहे. मतदार याद्या चाळा, गावतील नसलेले मतदान शोधून काढा. आपल्याला मतदान एजंट गरज नाही. अख्खा गावच एजंट आहे. आपले चिन्ह माहिती नाही, गावोगाव जाऊन काय सांगणार? आपण उमेदवार, चिन्ह सांगितल्यावर दोन घंट्यात हे चिन्ह जगात माहित होणार आहे, चिंता करू नका. गरजवंत मराठे यांना गडबड नाही, ते २० नोव्हेंबरला शांत डोक्याने मतदान करतील, असे मनोज जरांगे म्हणाले. आपल्याला संपवण्याचा विडा उचलणाऱ्यांना संपवायचं म्हणजे संपवायचे. इथून पुढच्या काळात प्रत्येकाला वाटलं पाहिजे की मराठ्यांना संपवायला जाणाऱ्यांना संपाव लागते, असा इशारा जरांगेंनी दिला.

### मराठ्यांची मान खाली जाऊ देऊ नका

तुमचं मत जर कुणाला विकले तर तुमची जात संपेल. मराठा रस्त्याने जाताना टाईट चालला पाहिजे. मान खाली घालून जायला नाही पाहिजे. या निवडणुकीच्या आणि राजकारणाच्या नादात मराठ्यांची मान खाली जाऊ द्यायची नाही. समाजाची पाविञ्य जपा. समाजाची उंची जपा समाज हा सागरासारखा राज्यात पसरला आहे राज्याच्या बाहेर सुद्धा आहेत. काही करून हा समाज संपवू देऊ नका. आपल्याला महाविकास आघाडीचे महायुतीचे काही देणे घेणे नाही. माझी तळमळ आणि माझी कळकळ समाजासाठी आहे. निवडणुका येतील निवडणुका जातील. आपला तो हट्ट नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.




CMYK

## पोलिस हुतात्मा दिन

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत – तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो. २४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला. १९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती. देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात. दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

# नांदेड क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेचे शानदार उद्घाटन







**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड येथील श्री गुरुगोबिंदसिंघजी क्रीडा संकुलामध्ये आजपासून राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेचा शानदार शुभारंभ करण्यात आला.नांदेडच्या जिल्हा क्रीडा संकुलात या संदर्भातील अद्यावत सेवा उपलब्ध करण्यात आल्या असून जिल्ह्याच्या यजमानपदामध्ये आज याचा प्रारंभ झाला.

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, जिल्हा क्रीडा परिषद,नांदेड संयुक्त विद्यमाने व नांदेड जिल्हा आर्चरी (धनुर्विद्या )असोसिएशन यांचे सहकार्याने चालू असलेल्या राज्यस्तरीय शालेय आर्चरी १४,१७,१९ वर्षे मुले–मुली . क्रीडा स्पर्धेचे आयोजन १८ ते २१ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत श्री गुरुगोबिंदसिंघजी स्टेडीयम, नांदेड येथे संपन्न होत आहे. या स्पर्धेचे उदघाटन आज दि. १९ ऑक्टोंबर,२०२४ रोजी सकाळी १०.०० वा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. महेशकुमार डोईफोडे यांचे शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन विजय संतान (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती विभाग व प्राचार्य,आर्चरी प्रबोधिनी, मिशन लक्षवेध, महाराष्ट्र राज्य), संतोष झगडे (अधीक्षक, एक्साईज विभाग, छ.संभाजीनगर),जयकुमार टेंभरे (जिल्हा क्रीडा अधिकारी,नांदेड), प्रमोद चांदुरकर (सचिव, महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन), श्रीमती वृषाली पाटील जोगदंड (सचिव, नांदेड जिल्हा आर्चरी असोसिएशन), श्रीनिवास भुसेवार (आर्चरी संघटना प्रतिनिधी) श्रीमती लता उमरेकर (आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू (दिव्यांग), अनूराग कमल, भारतीय आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक, आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक मेजर चंद्रकांत ईलग (बुलढाणा), प्रवीण सावंत (सातारा),अभिजीत दळवी (अहमदनगर), कुनाल ठावरे (पिंपरी चिंचवड), दिपक चिकणे (सोलापूर), अमर जाधव, क्रीडा मार्गदर्शक तथा आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक, अमरावती, पवन तोबट (अमरावती), प्रफुल्ल डांगे क्रीडा अधिकारी तथा आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक, अमरावती,रंजीत चामले (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त तथा आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक), मा. डॉ. शुभांगी अभिजीत दळवी (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त तथा क्रीडा अधिकारी– अहमदनगर) व आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या खेळाडू ज्ञानेश बालाजी चेरले–(नांदेड), सरदार तेजविंदरसिंघ जहागीरदार (नांदेड), शर्वरी शंडे (पुणे), मानव जाधव–(अमरावती), प्रितीका प्रदीप, आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या खेळाडू, वैष्णवी पवार–(लातूर), साईराज हालमे–(सोलापूर), वैष्णवी पाटील (आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या खेळाडू), बालाजी पाटील जोगदंड (संघटना प्रतिनिधी) आदि मान्यवर उपस्थित होते. स्वीप कार्यक्रम अंतर्गत कार्यक्रमाच्या सुरुवातीस १८ वर्षे पुर्ण झालेल्या सर्व खेळाडूंना व नविन मतदाराना मतदान करण्याविषयी शपथ देण्यात आली.

उदघाटन कार्यक्रम प्रसंगी महेशकुमार डोईफोडे म्हणाले की, शालेय जिवनात खेळ हा अतिशय महत्वाचा घटक असुन खेळाडूंनी शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही उल्लेखणीय कार्य करुन आपले करीयर घडवावे असे सांगीतले. क्रीडा विषयक बाबीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास महानगरपालिकेच्या वतीने भरभरुन सहकार्य करण्यात येईल असे सांगीतले. तसेच विजय संतान (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती विभाग व प्राचार्य,आर्चरी प्रबोधिनी, मिशन लक्षवेध, महाराष्ट्र राज्य), यांनी म्हणाले की, मिशन लक्षवेध कार्यक्रम अंतर्गत प्रत्येक खेळाडूंनी नोंदणी करणे आवश्यक असून त्यांना शासनामार्फत विविध क्रीडा विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस असल्याचे सांगीतले.

या कार्यक्रमाचे प्रस्तावीकात जयकुमार टेंभरे यांनी सांगीतले की, या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील विविध विभागातून खेळाडू मुले–मुली मोठयाप्रमाण सहभागी झाले असून यामध्ये निवडलेले खेळाडू नाडीयाड खेडा, गुजरात येथे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये संपन्न होणा– या राष्ट्रीय स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्याच्या संघाचे प्रतिनिधीत्व करणार असल्याचे सांगीतले.

या कार्यक्रमाचे सुत्र संचलन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.राहुल श्रीरामवार (क्रीडा अधिकारी) यांनी केले.

सदर स्पर्धा यशस्वी करणेसाठी मा.जयकुमार टेंभरे, जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. चंद्रप्रकाश होनवडजकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा कार्यासन), क्रीडा अधिकारी श्री. संजय बेतीवार, श्री. राहुल श्रीरामवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक श्री.बालाजी शिरसीकर, श्रीमती शिवकांता देशमुख, वरिष्ठ लिपीक श्री.संतोष कनकावार, व्यवस्थापक संजय चव्हाण, आनंद जोंधळे, हनमंत नरवाडे, आकाश भोरे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, शेख इकरम, विद्यानंद भालेराव, चंद्रकांत गव्हाणे, सोनबा ओव्हाळ, यश कांबळे व आर्चरी असोसिएशनचे पदाधिकारी व खेळाडू आदिनी सहकार्य करीत आहेत. सदर स्पर्धा श्री गुरुगोबिंदसिंघजी स्टेडीयम,नांदेड येथे आयोजीत करण्यात आले असून या स्पर्धे चा जास्तीत जास्त खेळाडूं, क्रीडाप्रेमी यांनी आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

# वजन कमी करण्यासाठी वापरा या टीप्स, झटक्यात होईल लठ्ठपणा कमी



लठ्ठपणा हा एक आजार नसून जीवनशैलीचा विकार आहे. आपण काय खातो आणि किती व्यायाम करतो याबाबत आपण केलेल्या निवडीतून लठ्ठपणा उद्भवतो. मात्र तो कमी करण्यासाठी आव्हान अलिकडच्या वर्षांत वेगाने विकसित होत आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ५० वर्षांपूर्वी लठ्ठपणा हा कोणताही आजार नव्हता. त्यावेळेस व्यक्ती अधिक सक्रिय जीवन जगत होते. सध्या आपल्याकडे असलेल्या उच्चकॅलरी आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांला घरात प्रवेश नव्हता. त्यामुळे लठ्ठपणा नागरिकांना होत नसल्याचे दिसून येत होते.

काय आहेत कारणे : आताची पीढी ही शारीरिक काम न करत नसल्याने अधिकाधिक सुस्त झाली आहे. त्यामुळे लठ्ठपणाच्या दरात लक्षणीय वाढ झाली. त्यातही अवेळी खाण्याच्या सवयीनेही लठ्ठपणा आणखी वाढत आहे. आपण घेत असलेले जेवण त्याच्या पौष्टिक मूल्यांबद्दल पुरेशी जागरूकता नाही. व्यक्ती सहसा त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा विचार न करता जेवण करतात. त्यामुळे लठ्ठपणाला आमंत्रण दिले जाते. आपण वारंवार शरीराच्या गरजेपेक्षा जास्त कॅलरी घेतो. परिणामी वजन वाढून हळूहळू लठ्ठपणा येतो. आपली सध्याची जीवनशैली आणि लठ्ठपणा आपल्या आरोग्यासमोरील महत्त्वपूर्ण आव्हाने आहेत. मात्र आपल्या दैनंदिन जीवनात सोप्या सवयींचे पालन करून त्यावर मात करता येते.

पौष्टिक आहार घ्या : लठ्ठपणामुळे व्यक्तीला अनेक आजारांचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपण पौष्टीक आहार घेणे गरजेचे आहे. आहारात कॅलरीचे प्रमाण संतुलित ठेवणे गरजेचे आहे. अर्थात आपल्या शारीरिक हालचालींच्या प्रमाणात कॅलरिजचे घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण अधिक सक्रिय जीवन जगले पाहिजे. त्यासह पौष्टिक आहार घेणेही गरजेचे आहे. चांगले पोषण आणि नियमित व्यायाम यावर आपला भर असला पाहिजे. यापैकी कोणत्याही एकाकडे दुर्लक्ष केल्यास आपल्या एकूण आरोग्यावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.

नैसर्गिक उद्दिष्ट : लठ्ठपणा आल्यानंतर बहुतेक नागरिक लिपोसक्शन सारख्या कॉस्मेटिक शस्त्रक्रियांचा पर्याय निवडतात. मात्र त्याऐवजी नैसर्गिक वजन कमी करण्याच्या धोरणांवर भर दिला पाहिजे. या शस्त्रक्रियांचे तात्पुरते परिणाम मिळू शकतात. मात्र दीर्घकाळासाठी ते हानिकारक ठरू शकते. त्यामुळे आपण वजन कमी करण्याच्या टिकाऊ आणि निरोगी तंत्रांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

करा शाश्वत बदल : लठ्ठपणा आलेल्या व्यक्तीला सतत आपल्या वजन कमी करण्याची चिंता सतावत राहते. मात्र त्यासाठी निरोगी जीवनाचे महत्त्व जाणून घेणे महत्वाचे असते. आपण खात असलेल्या अन्नाच्या पौष्टिक मूल्यांबद्दल जागरूक असले पाहिजे. आपल्या निवडींचा आपल्या आरोग्यावर होणारा परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी जीवनशैलीत शाश्वत बदल करणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करतात.

## कोकण हार्टेड गर्लचे सूर जुळले; सांगितलं बॉयफ्रेंडच नाव



बिग बॉस मराठीच्या पाचव्या सीझनने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. कारण पाचवा सीझन प्रचंड गाजला आहे. अशातच बिग बॉसमध्ये गाजलेली स्पर्धक 'कोकण हार्टेड गर्ल' अंकिता वालावलकर हे नाव महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलं आहे. अंकिता बिग बॉसच्या घरात असल्यापासूनच तिच्या होणाऱ्या जोडीदाराची प्रचंड चर्चा सुरु होती. मात्र आता स्वतः अंकिताने तिचा जोडीदार कोण आहे हे सोशल मीडियाच्या माध्यमातून सांगितलं आहे.

अंकिताने केला मोठा खुलासा :

अंकित वालावलकरने दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर तिच्या होणाऱ्या नवऱ्यासोबतचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. तसेच फोटो शेअर करताना अंकिताने तिच्या जोडीदारासाठी देखील खास पोस्ट लिहिली आहे. याशिवाय अंकिताने तिच्या जोडीदारासाठी खास फोटो शेअर करत ते दोघे लवकरच लग्न करणार असल्याची घोषणा देखील केली आहे.

याशिवाय 'कोकण कार्टेड गर्ल' अंकिताने इंस्टाग्रामवर बॉयफ्रेंडसोबतचा फोटो शेअर करत 'सूर जुळले' असं कॅप्शन देखील दिलं आहे. अंकिता वालावलकरचा बॉयफ्रेंड हा देखील एक कलाकार आहे. तसेच तो फिल्म इंडस्ट्रीमध्ये प्रचंड सक्रिय आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे अंकिता वालावलकरच्या बॉयफ्रेंडचं नाव हे कुणाल भगत आहे.

अंकिताचा बॉयफ्रेंड कुणाल हा एक संगीत दिग्दर्शक आहे. त्याने अनेक गाणी, चित्रपट आणि टीव्ही मालिकांचं संगीत दिग्दर्शन देखील केलं आहे. यामुळे कोकण हार्टेड गर्ल अंकिताने कुणाल सोबतच फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याच्यासाठी 'सूर जुळले' असं खास कॅप्शन दिलं आहे.

यासोबतच अंकिताने बॉयफ्रेंड कुणालसाठी आणखी एका खास पोस्ट देखील शेअर केली आहे. त्यावेळी तिने कॅप्शन मध्ये लिहलं आहे की, प्रेम हे एकमेकांसाठी जगणं आहे, हे तू सांगितलंस, काळाच्या ओघात कळलच नाही, आयुष्य कसं कुठे बदललं, तू भेटलास आणि पुन्हा जगावसं वाटलं. वचन देते एका सुखी कौटुंबिक आयुष्याची तुझी सहचारिणी असेन

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखा- जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

## नागरिकांनी सी-व्हीजल ॲपवर तक्रारी नोंदविण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यात ९ विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. यासाठी जिल्ह्यात १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता सुरु झाली आहे. या काळात पैशाची देवाण-घेवाण, भेट वस्तु वाटप, रोख रक्कम, अंमली पदार्थ, दारु विक्री व वाहतूक अशा घटनावर नियंत्रण होण्यासाठी संबंधित यंत्रणानी काळजी घ्यावी. यादृष्टीने जिल्ह्यात एफएसटी व एसएसटी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांनी जास्तीत जास्त कारवाई करुन जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राखण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले.

कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवन येथे आज त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवडणूक सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी आदीची उपस्थिती होती.

जिल्ह्यात विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूकीची आदर्श आचारसंहिता सुरु झाली असून या कालावधीत आचारसंहितेचा भंग होणार नाही यांची काळजी सर्व विभागानी घ्यावी. निवडणूका मुक्त, निर्भय वातावरणात व प्रलोभन मुक्त होण्यासाठी सर्व सहायक निवडणूक अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी. सर्व परिस्थितीवर एसएसटी व एफएसटी पथके बारीक लक्ष ठेवून आहेत. जिल्ह्यात वाहतूक होणाऱ्या सर्व वाहनाची इएसएमएसला नोंद होईल यादृष्टीने कारवाई व्हावी. जीएसटी. आयकर. पोलीस विभागांनी पेट्रोलिंग वाढवावे. तसेच सिझरचे प्रमाण वाढवावे अशा सूचना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच नागरिकांनी कुठेही आचारसंहिता भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास सि-व्हीजल पवर पुराव्यासह तक्रारी करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच यापुढे सि-व्हीजल पवर तक्रारी आल्यास संबंधीत विभागाने गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करावी असेही त्यांनी स्पष्ट केले.

नांदेड जिल्ह्यात १ हजार १५८ शस्त्र परवाने दिलेले आहेत. शस्त्र जमा करण्याची कारवाई प्रगती पथावर असून मागील लोकसभा निवडणूकीत ७८२ शस्त्र जमा करण्यात आली होती. नांदेड जिल्ह्यात ९ विधानसभा मतदार संघात ग्रामीण भागासाठी २ हजार २६५ व शहरी भागासाठी ८२३ असे एकूण ३ हजार ८८ मतदान केंद्र असून मतदान केंद्रावर गोंधळ होवू नये यासाठी तेथील नियुक्त पोलीस कर्मचाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी. जिल्ह्यात पाच सवेदनशिल मतदान केंद्र असून या ठिकाणी शांततेत मतदान प्रक्रीया होईल यासाठी सर्वांनी सतर्क रहावे, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

**निवडणूक काळात सतर्क राहा: जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार**

विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूक दोन्हीही निवडणूका एकत्र होत आहेत. या निवडणूक कालावधीत आपल्यावर जास्त जबाबदारी असून, उपलब्ध मनुष्य बळामध्ये ही मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडावयाची आहे. नांदेड जिल्हा इतर राज्याच्या सीमेला लागून असल्यामुळे एकमेकात समन्वय साधत निवडणूक कालावधीत रोख रक्कम, अंमली पदार्थ, शस्त्रास्त्र, मद्य यांची वाहतूक व विक्री होणार नाही यांची काळजी घ्यावी. नियुक्त केलेल्या विशेष पथकांनी जास्तीत जास्त दक्ष राहून कारवाया कराव्यात, असे निर्देश जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी दिले.

**स्वीप मार्फत मतदार जनजागृतीवर भर: मीनल करनवाल**

नांदेड जिल्ह्यात ९ विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूकीसाठी मतदान २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत आहे. या निवडणूकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी स्वीपमार्फत जनजागृती कार्यक्रम सुरु केले आहेत. यावेळी मतदानाचे जास्तीत जास्त उदिष्ट गाठण्यासाठी स्वीप मार्फत जनजागृती कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगितले.

## संक्षिप्त...


### काँग्रेसला आम्ही धक्क्यावर धक्के देणार, काँग्रेसचे ज्येष्ठ आणि जुने सहकारी आमच्या संपर्कात; माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या दावा



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** निवडणुकीचे पडघम जस जसे वाजू लागले आहेत तसे महाराष्ट्रा सह जालन्यात सुद्धा वातावरण तापायला लागले आहे.काँग्रेसचे ज्येष्ठ आणि जुने सहकारी आमच्या संपर्कात असून लवकरच ते आमच्या सोबत असतील असा दावा माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी केला आहे.आगामी काळात शिवसेनेमध्ये अनेक पक्षप्रवेश होणार असून यामध्ये काँग्रेसच्या दिग्गजांचा समावेश असणार असल्याचे ते म्हणाले. आज माध्यमांशी बोलत असताना खोतकर यांनी माजी आमदार कैलास गोरंटल यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. मेडिकल कॉलेज बाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच त्यांच्या तोंडावर थप्पड मारली असून यापूर्वी सुद्धा आपण त्यांना निवडणुकीमध्ये तीन वेळेस गाडले असल्याचे ते विसरून जातात का असा सवाल खोतकर यांनी उपस्थित केलाय.त्याच्या बालिश पणाला आपण उत्तर देणार नाही.. हे आयत्या बिळावरचा नागोबा आहे काहीही न करता श्रेय लाटण्यासाठी पुढे येत आहे.मागील वेळेस मी मंत्री असताना जे विकासकामे आणले होते त्याच कामांवर त्याने पाच वर्षे काढली असल्याचे खोतकर म्हणाले.

### बेलापूर विधानसभेमधून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या पहिली यादी जाहीर झाली असून मंदा म्हात्रे यांनी नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. बेलापूर विधानसभा तिकीट मिळविण्यासाठी विद्यमान आमदारासंह नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक हे ही इच्छुक होते त्यांनी तशी तयारी केली होती. मात्र भाजप च्या नेतृत्वाने आ. मंदा म्हात्रे यांच्यावर विश्र्वास टाकत पुन्हा त्यांना उमेदवारी दिली.माझ्या मतदार संघातील रुग्णालयाचे महत्वाचे कामं मला पूर्ण करायचे आहे आणि त्यासाठी मी पूर्ण कसोषीने प्रयत्न करणार असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले तसेच ज्यांनी माझ्या कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर जनताच त्यांना उत्तर देईल असेही त्यांनी नमूद केल आहे. यामुळे इच्छुक असलेले माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक काय भूमिका घेतात हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.


### भुसावळमध्ये उमेदवारी जाहीर, आमदार संजय सावकार यांना पुन्हा एकदा भाजपकडून तिकिट, कार्यकर्त्यांकडून जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**भुसावळ/प्रतिनिधी :**भाजप पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर होताचं संजय सावकारे यांच्या कार्यकर्त्यां कडून जल्लोष करण्यात आला. भारतीय जनता पार्टी कडून पहिली यादी जाहीर करण्यात आली या यादीमध्ये भुसावळचे विद्यमान आमदार संजय सावकारे यांचे नाव जाहीर झाले यामुळे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आमदार संजय सावकार यांच्या कार्यालयासमोर फटाक्याची आताशबाजी करून जल्लोष साजरा केला.

### गोदावरी पाटील यांचे निधन



**चाकूर/प्रतिनिधी :** चाकूर तालुक्यातील तळघाळ येथील सौ.गोदावरी राजेंद्र पाटील यांचे दिनांक १९ ऑक्टोबंर रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी वृध्दाप काळातील आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर तळघाळ येथील शेतात दिंनाक २० ऑक्टोबंर रोजी दुपारी अत्यंसंस्कार करण्यांत आले. या वेळी पंचक्रोशीतील नातेवाईक, आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, दोन मुले, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या शिवसेनेचे माजी तालूका प्रमुख दिलीप पाटील यांच्या आई होत.

### महासभा आयोजित महारक्तदान शिबिर २६ ऑक्टोबर ला

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा आयोजिय महारक्तदान शिबीर वी वर्षी प्रमाने येत्या २६ सप्टेंबर रोजी राज्यभरात आयोजित केले असल्याची माहिती महासचिव गोविंद बिडवाई यांनी सा वासवी देवी सोबत बोलताना दिली आहे सण २०२१ पासून दरवाजा वर्षी महासभे चे अध्यक्ष श्री नंदकुमार गादेवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्त महासभा राष्ट्रीय कार्य म्हणून हे कार्य करीत आहे

गत तीन वर्षात आयोजित करण्यात आलेल्या महाशिबिरातून सुमारे पाच हजार नऊशे सत्यहत्तर रक्त बॉटल संकलन करण्यात आल्याची माहिती पण त्यांनी दिली आहे यावर्षी पण उत्तम प्रतिसाद मिळेल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला

राज्यभरात ऐकाच दिवशी सर्व आर्य वैश्य समाज गावा गावातून हे शिबीर आयोजित करत आहे मराठवाडा विदर्भ पश्र्चिम महाराष्ट्र परिसरील सुमारे २१ जिल्ह्यात आर्य वैश्य आमज असून गडचिरोली ते नासिक आणि मुंबई ते देगलूर सोलापूर ते संभाजीनगर अश्या सर्व जिल्ह्यात समाजाकडून हे आयोजन होत आहे

# मतदार जागृतीसाठी जिल्हा स्वीप समितीचा ॲक्शन प्लॅन तयार




दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली/प्रतिनिधी :** मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूकपणे सहभाग वाढावा यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. येत्या २० नोव्हेंबर, २०२४ ला होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मतदारांनी उस्फूर्तपणे मतदान करावे. यासाठी मतदार जनजागृती करण्यासंदर्भात जिल्हाभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

याच अनुषंगाने जिल्हा स्वीप नोडल अधिकारी संदीप कुमार सोनटक्के आणि प्रशांत डिग्रसकर यांच्या नेतृत्वात जिल्हा स्वीप प्लॅन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्र्वर रोडगे आदी उपस्थित होते.

स्वीप प्लॅन तयार करण्यासाठी स्वीपचे जिल्हा समिती सदस्य विजय बांगर, बालाजी काळे, दीपक कोकरे आणि हनुमान गिराम यांनी काम केले.

# विजेत्या स्पर्धकांवर पारितोषिकांचा वर्षाव

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात जिल्हास्तरीय स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा थाटात




दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय आयोजित कॉमर्स आयकॉन क्वेस्ट २०२४ या जिल्हास्तरीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि.१८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला. यावेळी या स्पर्धेतील एकूण २४ विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, सदस्य दिनानाथ भुतडा, बालकिशन बांगड, विशाल लाहोटी, डॉ.पद्मा तोष्णीवाल (बियाणी), प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्र-प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्र-प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, प्र-प्राचार्य पुनम नाथानी, प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ.वाजेद चाऊस, प्राचार्य डॉ.प्रिती पटवारी, उप-प्राचार्य गणेश लहाने, स्पर्धा समन्वयक डॉ. निखिल व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एकूण २४ बक्षीसे वितरित करण्यात आली, ज्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाला अनुक्रमे २५००, १५०० आणि १००० रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रत्येक गटात तीन विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळाले. सदरील स्पर्धेची प्रथम फेरी ६ ऑक्टोबर तर द्वितीय फेरी १३ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून एकूण ६६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी स्पर्धा समन्वयक डॉ.निखिल व्यास यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेची माहिती व महत्व विशद केले. तसेच प्रा. योगेश शर्मा व डॉ.वाजपेयी यांनी सूत्रसंचालन केले तर प्र-प्राचार्य डॉ.प्रशांत मान्निकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. निखिल व्यास, प्रा.योगेश शर्मा, प्रा.शैलजा चिकटे, प्रा.राम पांचाळ, प्रा.पूजा भोसले, प्रा.सुहाना शेख, प्रा.क्षितिज कांबळे, वाणिज्य मंडळातील सर्व विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नांदेडच्या मध्यवर्ती बसस्थानकात कलापथकाच्या माध्यमातून एड्स जनजागृती

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगाराच्या मध्यवर्ती बसस्थानकात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (एमएसएसीएस) मुंबई व जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कलापथकाच्या माध्यमातून एड्स जनजागृती करण्यात आली. जिल्हा साधन व्यक्ती प्रकाश झिंझाडे, प्रकल्प व्यवस्थापक सोपान ईबिते, समुपदेशक गजानन ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली कलापथक प्रमुख अरविंद खंदारे, मास्टर ईरबा गाडेगावकर आणि त्यांच्या कला संचाने एड्स म्हणजे काय? मानवी शरीरातील संपादित रोग लक्षणांचा समूह म्हणजेच एड्स होय, असे त्यांनी आपल्या कला पथकाच्या जनजागृतीतून उद्बोधन केले. यावेळी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

ते आपल्या भाषणात म्हणाले की, कलापथक हे आपल्या कलेच्या माध्यमातून समाजात भरकटत जाणार्या घटकांना योग्य दिशा देण्याचे कार्य आपल्या कलेच्या माध्यमातून प्रबोधन करुन समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे काम ते करतात, ही अभिमानास्पद बाब असून ही काळाची गरज असल्याचे ते प्रतिपादन केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून प्रकल्प व्यवस्थापक सोपान ईबिते, जिल्हा साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक प्रकाश झिंझाडे, समुपदेशक गजानन ढेरे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाचे सुमीत सुर्यवंशी, शिवशंकर कदम, सौ. रत्नमाला पंडीत, मीरा अंकुश केंद्रे, पुजा शिंदे, शिवाजी रेणके, रविशंकर सोमेवार, कलापथक प्रमुख अरविंद खंदारे, मास्टर ईरबा



गाडेगावकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बसस्थानकातील प्रवाशी बंधु- भगिणींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या कार्यक्रमास प्रतिसाद दिला.

# उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा

## आमदार संजय रायमुलकर यांचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : विश्ववंदनीय बाळासाहेब ठाकरे, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव या सर्वांच्या आशीर्वादाने मी. गुरुवार दि. २४ ऑक्टोबर रोजी मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. त्यामुळे मतदार संघातील मतदार राजांनी तसेच महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आ. संजय रायमुलकर यांनी केले आहे.

महायुती सरकारने गोरगरीब, सर्वसामान्यांना डोळ्यासमोर ठेवून अनेक समाजपयोगी निर्णय घेतलेले आहेत. त्यामुळे मतदार राजा हा पुन्हा महायुतीचे सरकार महाराष्ट्रामध्ये बनवण्यासाठी महायुतीच्या बाजुने उभा आहे. मतदारराजा आशीर्वादाने. गुरुवारी दि. २४ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. हा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मतदार संघातील मतदारांनी मोठ्या संख्येने मेहकर येथील शिवसेना संपर्क कार्यालय येथे सकाळी ११ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन आ. संजय रायमुलकर यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### भाजपाकडून पुन्हा जयकुमार रावल यांना संधी, पहिल्याच यादीत नाव आल्याने आ. जयकुमार रावल यांनी मानले आभार



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : भारतीय जनता पक्षाच्या वतीने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. पहिल्याच यादीत नाव समाविष्ट असल्याने आमदार जयकुमार रावल यांनी भारतीय जनता पक्षाचे व नेत्यांचे आभार व्यक्त केला आहे. तसेच या निवडणुकीत विजय मिळवून पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येणार असल्याचा त्यांनी दावा केला आहे. आमदार जयकुमार रावल यांना शिंदखेडा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाच्या वतीने सलग पाचव्यांदा संधी मिळाली आहे.

### जालना रेल्वस्थानकातील भुयारी मार्ग पाण्याखाली; नागरिकांना काढावा लागत आहे पाण्यातून मार्ग



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** :मागील दोन दिवसांपासून जालना शहरासह संपूर्ण जिल्हा घरात व जालना शहरात जोरदार परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे जालना येथील रेल्वस्थानकावर रेल्वे विभागाने नुकताच बनवलेला भुयारी मार्ग हा पाण्याखाली गेला आहे. जमुना नगर,सरस्वती कॉलनी, रमाबाई नगर, आनंद नगर, जैन नगर, आदर्श नगर, विद्युत कॉलनी, तसेच रेल्वे कॉटर या भागातील हजारो नागरिक या भुयारी मार्गातून रोज रहदारी करत होते मात्र या परतीच्या पावसाने या भुयारी मार्गात पाणी साचले आहे. यामुळे रात्रीपासून या मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. तरी याकडे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी लक्ष द्यावे व या ब्रिजची झालेली दुरावस्था पाहून सुरळीत रस्ता या रहिवाशांना करून द्यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### विधानसभा/ लोकसभा मतदान व मतमोजणी पासेस बाबत

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : नांदेड विधानसभा व लोकसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान व मतमोजणीसाठी ज्या माध्यम प्रतिनिधीना ( फक्त प्रिन्ट व सॅटेलाईट न्यूज चॅनेल्सचे प्रतिनिधी ) प्राधिकार पत्र हवे असतील त्यांनी तीन अधिक तीन अशी एकूण सहा छायाचित्र देणे आवश्यक आहे.तसेच यासोबत विहित नमुना देण्यात येत आहे. त्या विहित नमुन्यात प्राधिकार पत्र द्यावयाच्या व्यक्तीचे नाव, पदनाम, व संबंधित वृत्त संस्थेचे नाव व पत्ता आहे. मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत नमूद करावे . छायाचित्राच्या झेरॉक्स प्रति स्वीकारल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी .सदर माहिती संपादकाच्या लेटरहेडवर सही व शिक्का भरून कार्यालयास २१ ऑक्टोंबर २०२४ रोजी सोमवारी संध्याकाळी सात वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावेत.त्यानंतर आलेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही.

### मौजे ब्रम्हपुरी गोदावरी नदीच्या पात्र परिसरात कलम १४४

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : मौजे ब्रम्हपुरी येथील गोदावरी नदी पात्र परिसरात शांतता व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नदी पात्रातील परिसर प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून २० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते १९ नोव्हेबर २०२४ चे मध्यरात्री पर्यंत घोषित करण्यात आले आहे. त्याबाबत जिल्हादंडाधिकारी कार्यालयाने आदेश निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन चतु:सिमा पूर्वेस वाजेगाव कोल्हापुरी बंधारा, पश्र्चिमेस नांदेड ते देगलूर कडे जाणाऱ्या रोडवरील जुना पूल, दक्षिणेस गोदावरीचे नदीचे पात्र आणि उत्तरेस चिल्ला/दर्गाची संरक्षण भिंत यामधील जागा २० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते १९ नोव्हेबर २०२४ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रमाणे प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून जिल्हादंडाधिकारी यांनी घोषित केले आहे.

हा आदेश शासकीय कर्तव्यावरील अधिकारी व कर्मचारी, एक खिडकी पथकातील अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या भाविकांना तसेच ज्यांना जिल्हाधिकारी नांदेड व पोलीस अधीक्षक नांदेड यांनी परवानगी दिली अशा व्यक्तींना लागू राहणार नाही.

## सामाजिक न्याय हक्क मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्यासोबत जाऊ अन्यथा नोटाला मतदान करू : संजयभाऊ कांबळे




दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी:** होऊ घातलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जे कोणी राजकीय पक्ष आम्हाला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतील त्यांच्यासोबत आमचा समाज जाईल अन्यथा नोटाला मतदान करणार असल्याची माहिती भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.

समाजाच्या हितासाठी आणि विकासासाठी सत्ता मिळवा. अन्यथा आपले संविधानिक हक्क आणि अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करा,असा मरणोत्तर सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्यामुळे १९७२ साली ' माझा समाज माझं संघटन' हा नारा घेऊन भारतीय दलित पँथर उदयास आली. न्याय, हक्क आणि संरक्षणासाठी अविरत कार्य करून एकजुटीच्या माध्यमातून स्वाभिमान शिकवणाऱ्या दलित पँथरचा धसका संपूर्ण महाराष्ट्रासह अख्ख्या देशानेही घेतला होता. ती दलित पँथर १९९५ साली रिपब्लिकन ऐक्यामधेय सामील झाल्याने समाजाच्या प्रश्र्नावर एकजुटीने व ताकदीने लढताना आज कोणी दिसत नाही. सगळेच निवडणुकीच्या नादाला लागल्याने सामाजिक प्रश्र्न, ऐक्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आम्ही दलित पँथर पुनर्जीवित केल्याचे सांगून संजयभाऊ कांबळे म्हणाले की, त्या काळातील दलित पँथर एकजुटीच्या ताकदीवर लढली व वाढली. आता सुशिक्षितांना प्रशिक्षित करूनच संविधानिक मार्गाने संघर्ष करण्यासाठी कार्यकर्ता तयार केला जात आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये भारतीय दलित पँथरची ताकद खूप वाढली आहे. मात्र, निवडणूक लढवणे आमचा उद्देश नसल्यामुळे निवडणुकीला कोणी उमेदवार उभा राहणार नाही. परंतु उमेदवाराला निवडून आणण्याची क्षमता भारतीय दलित पँथर मध्ये आहे. महाराष्ट्रविधानसभेची तयारी जोरात सुरु आहे. आमचा आमच्या समाजावर विश्र्वास आहे. आम्ही सामाजिक न्याय, हक्कासाठी लढणारे आहोत. लोकशाहीत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदान कऱ्हे अत्यंत आवश्यक असते. आज आमच्या समाजाने कोणाला मतदान करावे ? हा प्रश्न आमच्यासमोर असल्याने जे कोणी आमच्या सामाजिक न्याय हक्कासाठी पुढे येऊन हमी देतील, त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय आम्ही सार्वमताने घेतला आहे. आमच्या प्रश्नासाठी कोणी पुढाकार घेत नसल्यास अथवा कार्यकर्त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देत नसल्यास आम्ही नोटांवर मतदान करणायचा निर्णय घेतला असल्याचे कांबळे यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी प्रा. बालाजी आचार्य, सुनील क्षीरसागर, धम्मानंद घोडके, सतीश मादळे, महेंद्र आचार्य, नारायण गायकवाड, संग्राम कदम, राजीव कांबळे, सतीश वाघमारे, गोविन्दन गायकवाड, हरिशचंद्र वाघमारे, अजय शृंगारे , रुपेश गायकवाड, माधव बनसोडे, बजरंग गायकवाड, सत्यवान जोगदंड, कैलास क्षीरसागर, विशाल कांबळे, उत्तम कांबळे, लहू शिंगे, राजकुमार घाडगे, धम्मपाल सावंत आदी उपस्थित होते.

## नवनीत राणा यांचं राजकीय पुनर्वसन होणार?


दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजप नेत्या नवनीत कौर या अमरावती लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्या. काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडे यांनी त्यांचा पराभव केला. अशात नवनीत राणा यांचं राजकीय पुनर्वसन केलं जाणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत.

नवनीत राणा यांना भाजपकडूनच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत पुन्हा उमेदवारी द्यावी मागणी करण्यात आली आहे. भाजप नेत्या नवनीत राणा या नांदेड लोकसभा पोटनिवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नवनीत राणा यांचं राजकीय पुनर्वसन होणार

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसोबत नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची देखील घोषणा केली. काँग्रेस खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे नांदेडची जागा रिक्त झाली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदानादिवशीच म्हणजे २० नोव्हेंबरलाच या लोकसभेसाठी मतदान आणि २३ नोव्हेंबरला निकाल असणार आहे.



नांदेडची पोटनिवडणूक घोषित झाल्यानंतर काँग्रेसकडून वसंत चव्हाण यांचे चिरंजीव रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. रविंद्र चव्हाण हे नांदडचे दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांचे सुपुत्र आहेत. काही महिन्यांपूर्वी वसंत चव्हाण यांचे निधन झाल्यामुळे येथील जागेवर पोटनिवडणूक घेण्यात येत आहे.

काँग्रेसकडून रविंद्र चव्हाण यांना उमेदवारी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गेल्याच महिन्यात महाराष्ट्र दौरा केला होता, त्यावेळी नांदेडमध्ये दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली होती. त्याचवेळी, येथील पोटनिवडणुकीत रविंद्र चव्हाण यांनाच उमेदवारी देण्यात येईल, असं त्यांच्याकडून सांगण्यात आलं होतं.

पोटनिवडणुकीत रविंद्र चव्हाण यांच्याविरोधात नवनीत राणांना उमेदवारी देण्याची मागणी करण्यात येत आहे. मात्र नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी भाजप महायुतीकडून कोणाला उमेदवारी देण्यात येईल हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## एमडीए स्कूल ऑफ फार्मसी येथे विभागीय हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन



दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी:** कोळपा येथील एमडीए स्कूल ऑफ फार्मसी येथे आयोजित सोलापूर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे अंतर्गत सोलापूर विभागीय हॉलीबॉल स्पर्धा (मुले व मुली ) एमडीए फाउंडेशनच्या शैक्षणिक संकुलात संपन्न होत आहे. स्पर्धेच्या उद्घाटनास विभागीय क्रीडा स्पर्धेचे सचिव प्रा.एस.एस.कोरे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. स्पर्धेचे निरीक्षक डॉ.दरेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमास एमडीए फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रियमबदा सारंगी,एमडीए शैक्षणिक संकुलाचे संचालक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य रवी कुऱ्हाडे हे उपस्थित होते.

या स्पर्धेत मुलांचे २१ व मुलींच्या ८ संघांनी सहभाग नोंदवला आहे.या स्पर्धेसाठी संघ मार्गदर्शक म्हणून प्रा.मंगेश पवार व व्यवस्थापक म्हणून प्रा.अक्षय बेनकी हे काम पाहत आहेत.प्रा.एस.टी. काळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमास शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## बेलगाव येथील मंजूर विहिरीच्या कामांना प्रारंभ

### सरपंच विमल अर्जुनराव वानखडे यांच्या पाठपुरावाले यश

दैनिक आपला विदर्भ





**बेलगाव/प्रतिनिधी** : सिंचना चा अभाव लक्षात घेता शेतकऱ्यांना सिंचन विहिरी उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच विमल अर्जुनराव वानखेडे व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्यला यश आले असून गावात तीन विहिरींना मंजुरात मिळाली आहे. यातील शंकर जाधव यांच्या विहिरीचे कामाला प्रारंभ करण्यात आला आहे तर उर्वरित विहिरींचे काम सुद्धा लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती वानखेडे यांनी दिली आहे. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत बेलगाव ग्रामपंचायतीला तीन विहिरी मंजूर करण्यात आल्या होत्या.या सिंचन विहिरीसाठी चार लाख रुपयांचा निधी मंजूर करून ४० फूट खोल व २४ फूट रुंद अशा कामाच्यासिंचन विहिरीला विहिरीच्या प्रशासकीय कामाला कार्यारंभ करण्याचे आदेश मिळाले असून शंकर जाधव यांच्या विहिरीच्या कामाला प्रारंभ करण्यात आला आहे.

यावेळी सरपंच विमल वानखेडे, यांचे पती अर्जुनराव वानखेडे. गजानन शामराव जाधव, प्रशांत गिरीधर हिवाळे, अमोल रमेश वानखेडे, भाजपा उपजिल्हाध्यक्ष अर्जुनराव वानखेडे, मनोज वानखेडे,अशोक जाधव, शंकर जाधव, गणेश मोरे, विश्वनाथ कव्हर, संतोष ताजने,विशाल जाधव, निलेश इंगळे यांची उपस्थिती होती. गावातील शेतकऱ्यांना सिंचन विहिरी मिळाव्यात त्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी सरपंच व ग्रामपंचायत प्रशासनाने शासन प्रशासनाकडे पाठपुरावा केल्याने गावात चाळीस फूट खोल व वीस फूट रुंद अशा चार लाख रुपये अनुदानाच्या तीन विहिरींना मंजूरी मिळाली होती.

या विहिरींना कार्यारंभ करण्याचा आदेश मिळाला असून सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या कामांना प्रारंभ करण्यात आला आहे. सरपंच व इतर पदाधिकाऱ्यांनी सदर वीर मंजूर करून घेण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याबद्दल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केल्या जात आहे.